सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य
महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१

क्र.पोमसं/३६/र.वका.(८३००)शा.नि.-अधिसूचना/०१/२०२६, मुंबई, दि. ई.स्वाक्षरीत नमुद

**संदर्भ** :- महाराष्ट्र शासन, गृह विभाग, शासन निर्णय क्रमांक-सीसीटी-३६१९/प्र.क्र.३६/E-७४६७१५/भाग २/पोल-३, दि. १८/०२/२०२६.

**विषय** :- राज्यात ई-चलान प्रकल्प राबविण्यासाठी सल्लागार नियुक्त केलेल्या मे. केपीएमजी कंपनीस मुदतवाढ देण्याबाबत.

*****

महाराष्ट्र शासन, गृह विभाग, शासन निर्णय क्रमांक-सीसीटी-३६१९/प्र.क्र.३६/E-७४६७१५/भाग २/पोल-३, दि.१८/०२/२०२६ ची प्रत महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक २०२६०२१८१७४१५२४०२९ असा आहे.

२. तरी, सदर शासन निर्णयानुसार कृपया योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

Digitally signed by
CHANDRASHEKHAR GOVINDRAO SHINDE
Date: 20-02-2026 16:16:53

( चंद्रशेखर शिंदे )
पोलीस महासंचालक यांचे उपसहायक (र.व.का) (अति.कार्यभार )
पोलीस महासंचालक राज्य, मुंबई यांचेकरिता.

प्रति,
अपर पोलीस महासंचालक वाहतुक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रत :-
पोलीस उप अधिक्षक, संगणक कक्ष, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२. पोलीस उप अधिक्षक, यांना विनंती करण्यात येते की, सदरहू शासन निर्णयाची प्रत या कार्यालयाच्या www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर शासन निर्णय / परिपत्रके "लेखा" या सदराखाली प्रकाशित करण्यात यावा.

राज्यात ई-चलान प्रकल्प राबविण्यासाठी सल्लागार म्हणून नियुक्त केलेल्या मे. केपीएमजी कंपनीस मुदतवाढ देण्याबाबत.....

**महाराष्ट्र शासन**
**गृह विभाग**
**शासन निर्णय क्रमांक : सीसीटी-३६१९/प्र.क्र.३६/E-746715/भाग-२/पोल-३,**
**मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,**
**मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.**
**दिनांक : १८.२.२०२६.**

**वाचा:-**

(१) माहिती व तंत्रज्ञान संचालनालय, शासन निर्णय क्रमांक: GAD-मातंस०८०/४/२०१४-O/O Directorate of IT-DIT(MH), दि.१.७.२०१४ व दि.९.५.२०१९ दिनांक २४.४.२०२३, दि. ५.१०.२०२३
(२) गृह विभाग, शासन निर्णय क्रमांक: गृहआ-२०१५/प्र.क्र.२३०/आस्था-२,दिनांक २०.५.२०१५.
(३) अपर मुख्य सचिव (गृह) यांच्या अध्यक्षतेखालील प्रकल्प अंमलबजावणी समितीच्या दिनांक २३.८.२०१६ रोजीच्या बैठकीचे इतिवृत्त.
(४) गृह विभाग, कार्यादेश क्रमांक टीआरए / १२१३ / प्र.क्र.९/शिकाना/पोल-८, दिनांक ६.९.२०१६
(५) अपर मुख्य सचिव (गृह) यांच्या अध्यक्षतेखालील उच्चस्तरीय शक्ती प्रदत्त समितीच्या दिनांक ५.३.२०१९, दिनांक ३१.५.२०२१ व दिनांक २७.५.२०२२ व दिनांक २०.४.२०२३ व दिनांक ९.१०.२०२३, दि.१६.१.२०२४ व दि.१३२.२०२५ रोजीच्या बैठकीचे इतिवृत्त.
(६) गृह विभाग, शासन निर्णय सीसीटी३६१९/प्र.क्र.३६/पोल-३, दिनांक ७.८.२०१९, दिनांक २१.९.२०२१, दिनांक १८.८.२०२२, दिनांक २१.६.२०२३. दिनांक ४.१२.२०२३.
(७) अपर पोलीस महासंचालक, (वाहतूक), महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्र.अपोमसं (वा)/ ४५ / ई-चलान/मुदतवाढ/२३१२/२०२३, दिनांक ३.७.२०२३
(८) अपर पोलीस महासंचालक, (वाहतूक), महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र जा.क्र.अपोमसं (वा.) /४५/नियोजन/ई-चलान/HPC बैठक आयोजन/३०७०/२०२३, दिनांक १.९.२०२३
(९) अपर पोलीस महासंचालक, (वाहतूक), महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र जा.क्र.अपोमसं(वा.)/४५/नियोजन/ई-चलान/केपीएमजी सल्लागार मुदतवाढ शासन निर्णय/५८४३/२०२५ दिनांक १९.१२.२०२५.
(१०) अपर मुख्य सचिव (गृह) यांच्या अध्यक्षतेखाली उच्चस्तरीय शक्ती प्रदत्त समितीच्या दि.६.११.२०२५ रोजीच्या बैठकीचे इतिवृत्त पत्र दि.२०.११.२०२५.

**प्रस्तावना :**

प्रकल्प सल्लागाराच्या मुदतवाढीबाबतची पार्श्वभूमी थोडक्यात पुढीलप्रमाणे : शासन पत्र, गृह विभाग क्र.TRA/१२१३/C.R.०९/SHIKANA/POL-८,दि.०६.०९.२०१६ नुसार राज्यात वन स्टेट वन ई-चलान प्रकल्प राबविण्याकरीता मे. केपीएमजी या सल्लागार कंपनीची प्रकल्प सल्लागार म्हणून नेमणूक करण्यात आली. तद्नंतर वेळोवेळी खालीलप्रमाणे कालावधी वाढवून देण्यात आला.

| अ. क्र. | सल्लागारास मुदतवाढ दिल्याच्या शासन निर्णयाचा/ शासन पत्राचा दिनांक | नियुक्त केलेल्या सल्लागाराचा तपशिल (पद व संख्या) | कालावधी |
|---|---|---|---|
| १ | ७.८.२०१९ | १ वरिष्ठ सल्लागार | दि.१०.२.२०१७ ते ३०.९.२०२० |
| २ | २१.९.२०२१ | १ वरिष्ठ सल्लागार<br>१ वरिष्ठ सल्लागार (Quarterly Milestone) | दि.१.१०.२०२० ते ३१.५.२०२१<br>दि.१.६.२०२१ ते ३०.११.२०२१ |
| ३ | १८.८.२०२२ | १ वरिष्ठ सल्लागार | दि.१.१२.२०२१ ते ३१.१२.२०२२ |
| ४ | २१.६.२०२३ | १ वरिष्ठ सल्लागार | दि.१.१.२०२३ ते ३०.६.२०२३ |
| ५ | ४.१२.२०२३ | १ वरिष्ठ सल्लागार<br>२ वरिष्ठ सल्लागार पोलीस महासंचालक वाहतूक यांनी कार्यादेश दिल्याच्या तारखेपासून एक वर्ष नेमणूक करण्यास मान्यता | दि.१.७.२०२३ ते १९.९.२०२३<br>(दि.८.४.२०२४ ते ७.४.२०२५) |
| ६ | २१.३.२०२४ | १ सल्लागार | दि. २०.९.२०२३ ते १९.९.२०२४ |
| ७ | २.६.२०२५ | १ सल्लागार | दि. २०.९.२०२४ ते १९.९.२०२५ |
| | ६.११.२०२५ च्या HPC बैठकीत मान्यता दिली. | १ सल्लागार | दि.२०.९.२०२५ ते १९.९.२०२६ |

आता अपर मुख्य सचिव (गृह) यांच्या अध्यक्षतेखाली उच्च स्तरीय शक्ती प्रदत्त समितीच्या दि.६.११.२०२५ रोजीच्या "वन स्टेट वन ई-चलान प्रकल्पाकरीता प्रकल्प सल्लागार म्हणून KPMG Advisory Services Pvt. Ltd. कंपनीच्या एका सल्लागारास दि. २०/०९/२०२५ ते दि. १९/०९/२०२६ या कालावधीकरीता मुदतवाढ देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यानुसार ई-चलान प्रकल्पाच्या देखरेखीसाठी प्रकल्प सल्लागार म्हणून मे. केपीएमजी प्रा. लि., या कंपनीच्या एक सल्लागार यास पूर्णवेळ तत्वावर दि.२०.९.२०२५ ते दि.१९.९.२०२६ पर्यंत माहिती तंत्रज्ञान विभागाच्या दि.५.१०.२०२३ रोजीच्या शासन निर्णयास अनुलक्षून मुदतवाढ देण्याबाबतचा उच्चस्तरीय शक्ती प्रदत्त समितीच्या निर्णयानुसार शासन निर्णय निर्गमित करणे आवश्यक आहे.

**शासन निर्णय :**

अपर मुख्य सचिव (गृह) यांच्या अध्यक्षतेखालील "उच्चस्तरीय शक्ती प्रदत्त समिती" च्या दिनांक ६.११.२०२५ रोजीच्या बैठकीतील निर्णयानुसार "वन स्टेट वन ई-चलान प्रकल्पाकरीता प्रकल्प सल्लागार म्हणून KPMG Advisory Services Pvt. Ltd. कंपनीच्या एका सल्लागारास दि. २०/०९/२०२५ ते

दि.१९/०९/२०२६ या कालावधीकरीता माहिती तंत्रज्ञान विभागाच्या दि.५.१०.२०२३ रोजीच्या शासन निर्णयास अनुलक्षून मुदतवाढ खालील अटी व शर्तींच्या आधिन राहून देण्यात येत आहे."

(१) सदर कालावधीत सल्लागार यांनी एन.आय.सी. ई चलान प्रणालीचे संपुर्ण राज्यामध्ये अंमलबजावणी होणेकरीता सर्वोतोपरी प्रयत्न करावेत. त्याचप्रमाणे एन.आय.सी. प्रणालीबाबतच्या प्रस्तावास शासनाकडून प्रशासकीय मंजुरी प्राप्त झाल्यानंतर ६ महिन्यांच्या कालावधीत सदरहू प्रणालीची राज्यभर अंमलबजावणी करावी. सदर अंमलबजावणीस विलंब झाल्यास, सदर होणाऱ्या विलंबाकरीता मे.के.पी.एम.जी.सल्लागार यांना प्रकल्पाची पुर्णपणे राज्यस्तरावर अंमलबजावणी होईपर्यंतच्या कालावधीकरीता दर दिवशी प्रमाणे रू.५०००/- इतक्या रक्कमेचा दंड आकारण्यात येईल.

(२) तसेच एन.आय.सी. ई-चलान प्रकल्प दिलेल्या मुदतीत संपुर्ण महाराष्ट्र राज्यात राबविण्यासाठी येणाऱ्या अडी-अडचणी संदर्भात वेळीच शासनाचे संबंधित विभागांना कळविण्याची जबाबदारी ही सल्लागारांची राहिल. त्यानंतर एन.आय.सी. ई चलान स्थलांतरणाबाबत येणाऱ्या अडी-अडचणी संदर्भात आढावा घेवुन विलंबास कारणीभूत होणाऱ्या बाबीचा आढावा घेवुन त्या निदर्शनास आणुन द्याव्यात. जेणेकरून एकूण विलंबाचे विश्लेषण करताना ते विचारात घेतले जाईल"

२. उपरोक्त सल्लागारांना देण्यात येणारे मानधन व इतर भत्ते माहिती व तंत्रज्ञान विभागाच्या दिनांक ५.१०.२०२३ च्या शासन निर्णयातील तरतूदीनुसार देय राहील तथापि, माहिती व तंत्रज्ञान विभागाने सल्लागारांच्या मानधनासंदर्भात भविष्यात काही सुधारणा केल्यास सदर सुधारणा उपरोक्त सल्लागारांना लागु राहतील. तसेच त्यासाठी माहिती व तंत्रज्ञान विभागाने सदर कंपनीची नेमणूक (Empanelment) करणे आवश्यक राहील.

३. सर्व सल्लागारांना देण्यात येणारे मानधन हे Man-Month/Quarterly Milestone तत्वानुसार असेल. सल्लागाराची देयके शासनास सादर करताना सल्लागाराने महिन्याच्या/तिमाहीच्या कालावधीत केलेल्या कामाचा तपशील/अहवाल शासनास सादर करणे आवश्यक आहे.

४. ई-चलान प्रकल्पासाठी नेमण्यात आलेल्या सल्लागारांच्या मानधनाबाबतचा खर्च पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या अधिनस्त असलेल्या "मागणी क्र. बी-१, २०५५-पोलीस, (००) १०९, जिल्हा पोलीस, (००) (०१) जिल्हा पोलीस बल, १३, कार्यालयीन खर्च (२०५५ ०१६८)" या लेखाशीर्षाखाली उपलब्ध अनुदानातून भागविण्यात यावा. ई-चलान प्रकल्पासाठी नविन लेखाशीर्ष मंजूर करण्याबाबतची कार्यवाही वित्त विभागाच्या मान्यतेने करण्यात येत आहे. त्यास अनुलक्षून प्राप्त नविन लेखाशीर्षाखालील त्या-त्या वर्षाच्या उपलब्ध अनुदानातून भागविण्यात यावा.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२६०२१८१७४१५२४०२९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने स्वाक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

RAJENDRA TANAJI BHALWANE

Digitally signed by RAJENDRA TANAJI BHALWANE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=HOME DEPARTMENT,
2.5.4.20=38d121bf4a170d16dacf98520f0ac44551976931d2758148ccaa24d1fb27b9df, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=BADFC0DAA40CC485400AAD9CEABCD514095659A6CDFAC856815518DCD188C23A, cn=RAJENDRA TANAJI BHALWANE
Date: 2026.02.18 17:42:54 +05'30'

**(रा.ता.भालवणे)**
**उपसचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत :**

(१) मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
(२) अपर मुख्य सचिव, गृह विभाग, मंत्रालय मुंबई.
(३) प्रधान महालेखाकार (लेखा परीक्षा)-१, महाराष्ट्र राज्य,मुंबई.
(४) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
(५) अपर पोलीस महासंचालक, वाहतूक, मुंबई.
(६) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता / लेखा परीक्षा), महाराष्ट्र-१/२, मुंबई / नागपूर.
(७) विशेष पोलीस महानिरीक्षक, सायबर, मुंबई.
(८) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
(९) निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
(१०) सह संचालक, लेखा व कोषागारे, संगणक कक्ष, नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालय, मुंबई.
(११) कक्ष अधिकारी, व्यय-७ / वित्तीय सुधारणा-१, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
(१२) मे.केपीएमजी ॲडव्हायझरी सर्व्हीसेस प्रा.लि., मुंबई.
(१३) अर्थ शाखा गृह विभाग.
(१४) निवड नस्ती / पोल-३.